# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001

YEAR : 34) 15th July 2009 ( No : 08

# हा कोणता सहावा वेतन आयोग आहे ?

## काळा, गोरा, सावळा की पिवळा ?

*दिनांक २६ जुलै २००९ रोजी महासंघाच्या कार्यकारी मंडळाने सम्मत केलेल्या ठरावातील परिच्छेद ७ ते ९ पहा*

## महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक २६ जुलै २००९ रोजी झालेल्या बैठकीत सम्मत झालेला ठराव

महाराष्ट्र शासनाचे उपसचिव श्री. रा.गो.जाधव यांनी दिनांक २४ जुलै २००९ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला (यापुढे महासंघ असा उल्लेख) एक पत्र (यापुढे उल्लेख 'शासनाचे पत्र' असा) पाठविले असून त्याच्या परिच्छेद १ मध्ये सहाव्या वेतन आयोगाबाबत शासनाची भूमिका काय आहे, ते कळविले आहे.

२. या पहिल्या परिच्छेदाचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास या परिच्छेदातून नोकरशाहीच्या पोटातील सारे काळेबेरे बाहेर आलेले आहे आणि आपल्याशी फार मोठा धोका होत आहे ही जी सबंध महाराष्ट्रभर प्राध्यापकांची भावना होती ती या एका वाक्याने खरी ठरविली आहे. उपसचिवांनी हे मौलिक वाक्य लेखी स्वरुपात महासंघाला कळविले आहे त्याबद्दल त्यांचे मानावे तेवढे आभार थोडेच आहेत. ते वाक्य पुढील प्रमाणे आहे.

**"केंद्र शासनाच्या मानव संसाधन विकास विभागाच्या पत्र क्रमांक 1-32/2006-U-II/U.1(i), दिनांक ३१ डिसेंबर, २००८ अन्वये अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षक संवर्गासाठी ज्या वेतनश्रेणी इ. बाबतच्या शिफारशी केल्या आहेत, त्याचा राज्य मंत्रिमंडळाने २३ जुलै, २००९ रोजी विचार करुन राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे १ जानेवारी, २००६ पासून सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत निर्णय घेतला आहे."**

३. खरे म्हणजे वेतनश्रेण्यांचा कालखंड केव्हाच संपलेला आहे. "Pay Band व Grade Pay" चा काळ सुरु झालेला आहे, हे सुद्धा बिचाऱ्या उपसचिवांच्या लक्षात राहिले नाही. त्यांच्या एका वाक्यात किती भक्कम विष भरलेले आहे याचे विश्लेषण होणे आवश्यक आहे. हे वाक्य काळजीपूर्वक वाचल्यास :-

(१) मा. मंत्रिमंडळाने काय विचारात घेतले व ते कोणत्या तारखेला विचारात घेतले हे या एका वाक्याच्या पूर्वार्धातून दिसून येते.

(२) मा. मंत्रिमंडळाने काय निर्णय घेतला हे सुद्धा या एका वाक्याच्या उत्तरार्धात नमूद आहे.

४. यापेक्षा तिसरी कोणतीही गोष्ट या एका वाक्यात नाही. आता एखाद्या प्राथमिक शाळेतील मुलाने जरी काळजीपूर्वक हे वाक्य वाचले तरी उपरोक्त दोन प्रश्नांची पुढील उत्तरे हाती येतात.

**मा. मंत्रिमंडळाने काय विचारात घेतले व ते कोणत्या तारखेला विचारात घेतले याबाबत मार्गदर्शन करणारा या एका वाक्यातील भाग पुढील प्रमाणे** :- "केंद्र शासनाच्या मानव संसाधन विकास विभागाच्या पत्र क्रमांक 1-32/2006-U-II/U.1(i), दिनांक ३१ डिसेंबर, २००८ अन्वये अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षक संवर्गासाठी ज्या वेतनश्रेणी इ. बाबतच्या शिफारशी केल्या आहेत, त्या राज्य मंत्रिमंडळाने २३ जुलै, २००९ रोजी विचारात घेतल्या"

**५. मा. मंत्रिमंडळाने काय निर्णय घेतला याबाबतचा या एका वाक्यातील उर्वरीत भाग पुढील प्रमाणे** :- "राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे १ जानेवारी, २००६ पासून सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत निर्णय घेतला आहे."

६. मंत्रिमंडळ विचार कशावरही करु शकते, त्यांच्यासमोर जी कागदपत्रे ठेवण्यात आली त्यावर त्यांनी विचार केला. मात्र निर्णय काय घेतला हे सर्वात महत्वाचे आहे. हा निर्णय "**राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे १ जानेवारी, २००६ पासून सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत निर्णय घेतला आहे.**" असा आहे.

७. ढोबळ मानाने सहावा वेतन आयोग, 'सहावा वेतन आयोग' असा शब्द मोघमपणे सर्वच जण वापरत असले तरी (१) दिनांक २४ मार्च २००८ रोजी मा. न्यायमुर्ती श्रीकृष्ण यांच्या अध्यक्षतेखालील सहाव्या वेतन आयोगाचा जो अहवाल "Report of the Sixth Central Pay Commission " सादर झाला त्याच्या आधारावर २९ ऑगस्ट २००८ रोजी केंद्र शासनाचा शासन निर्णय (No.1/1/2008-IC) निघाला व केंद्रातील शासकीय कर्मचाऱ्यांना वेतन सुधारणा लागू झाली व त्याआधारावर केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर राज्यातील कर्मचाऱ्यांना २७ फेब्रुवारी २००९ च्या राज्याच्या शासननिर्णयाने सहावा वेतन आयोग लागू करण्यात आला. (याला "श्रीकृष्ण आयोगाची वेतन सुधार योजना" असे म्हणू)

८. विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या सहाव्या वेतन आयोगाचा प्रवास कायद्याने अगदीच वेगळा ठेवला आहे. "Report of the Committee to Review the Pay Scales and Service Conditions of University and College Teachers, 2008" या विद्यापीठ अनुदान आयोगाने नेमलेल्या जी.के. चढ्ढा समितीचा अहवाल

विद्यापीठ अनुदान आयोगाला दिनांक ३ ऑक्टोबर २००८ रोजी सादर झाला. त्यावर विद्यापीठ अनुदान आयोगाने ७ व ८ ऑक्टोबर २००८ च्या बैठकीत विचार करुन वेतन सुधार व्यवस्था केंद्र शासनाकडे पाठविली व त्यावर केंद्र शासनाचा "Scheme of revision of pay of teachers and equivalent cadres in universities and colleges following the revision of pay scales of Central Government Employees on the recommendations of the Sixth Central Pay Commission." या मथळ्याचा शासन निर्णय "GOVERNMENT OF INDIA Ministry of Human Resource Development Department of Higher EducationNo.1-32/2006-U.II/U.I(i)New Delhi," दिनांक 31st December, 2008 रोजी निर्गमित झाला. केंद्राच्या या शासननिर्णयाप्रमाणे केंद्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना वेतन सुधारणा लागू झाली व ती राज्यांना लागू करावी असे कळविण्यात आले. याला आपण "विद्यापीठ अनुदान आयोगाची वेतन सुधार योजना" असे म्हणू.

९. या दोनही वेगवेगळ्या व्यवस्था आहेत. त्यातील पे बँडस् वेगवेगळे आहेत, ग्रेड पे वेगवेगळे आहेत, इतकेच नव्हे तर बढतीची व्यवस्था सुद्धा संपूर्णपणे वेगळी आहे. केंद्र शासनाच्या तशा सूचना नसतांना, प्राध्यापकांची तशी मागणी नसतांना आता राज्य शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे सहावा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला असेल तर त्यातून प्रचंड

**हेच ते कुप्रसिद्ध पत्र**

# *महाराष्ट्र शासन*

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग, : मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

### *क्र. एनजीसी २००८/२४३/२००८/विशि-१*

### दिनांक : २४ जुलै, २००९

प्रति,
**अध्यक्ष,**
महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटीज ॲण्ड कॉलेज टिचर्स ऑरर्गनायझेशन,
आर.के. गोकुळधाम, ओ/२०५
एस.व्ही.रोड, बोरीवली (प)
मुंबई- ४०० ०१२

**विषय :-** आपण पुकारलेला संप मागे घेण्याबाबत.

प्रिय महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने दिनांक १५ व १६ जुलै २००९ रोजी मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या समवेत झालेल्या आपल्या चर्चेनुसार मला आपणास खालीलप्रमाणे कळविण्याचे आदेश आहेत :-

(१) केंद्र शासनाच्या मानव संसाधन विकास विभागाच्या पत्र क्रमांक 1-32/2006-U-II/U.1(i), दिनांक ३१ डिसेंबर, २००८ अन्वये अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षक संवर्गासाठी ज्या वेतनश्रेणी इ. बाबतच्या शिफारशी केल्या आहेत, त्याचा राज्य मंत्रिमंडळाने २३ जुलै, २००९ रोजी विचार करुन **राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे १ जानेवारी, २००६ पासून सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत निर्णय घेतला आहे.**

(२) महाराष्ट्रातील अकृषि विद्यापीठे व संलग्नीत महाविद्यालये यांनी सन १९९१ ते ९९ या कालावधीत बरेचसे बिगर नेट सेट उमेदवार अधिव्याख्याता म्हणून नेमलेले आहेत. अशा अधिव्याख्यात्यांना नेट सेट अर्हतेपासून सूट देण्यासाठीचे प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनेनुसार आणि मा. न्यायालयांच्या निर्णयानुसार संबंधित विद्यापीठांनी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविलेले/पाठवावयाचे आहेत. ही प्रकरणे निकाली काढण्यासाठी शासन खालील प्रमाणे उपाययोजना करणार आहे. :-

**(i) राज्य शासन विद्यापीठ अनुदान आयोगाला व केंद्र शासनाला प्रलंबित प्रकरणे त्वरित निकाली काढण्यासाठी विनंती करील.**

(ii) विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सूट मिळाल्याचे पत्र विद्यापीठास प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून शक्यतो ३० दिवसाच्या आंत ती प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे शिबीर आयोजित करुन कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

विद्यापीठ अनुदान आयोगाने सूट देण्यासंदर्भातील छाननीचे बरेचसे कामकाज त्यांच्या स्तरावर पूर्ण केले असल्याचे कळते.

(३) आपल्या मुख्य मागण्यांकडे शासनाने योग्य ते लक्ष घातलेले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन आपण आपला संप मागे घेण्याची आपणास विनंती आहे.

आपला
**(रा.गो.जाधव)**
शासनाचे उप सचिव

संघर्षाचा एक नविन मुद्दा समोर आला असे होईल.

१०. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने सादर केलेला आंदोलनाचा ठराव वाचण्यास मा. मंत्रिमहोदयांना किंवा मा. सचिवांना वेळ नसला तर महासंघाचे त्याबाबत काय म्हणणे आहे हे त्या आंदोलन ठरावाच्या परिच्छेद ३.९ मध्ये पुढील उल्लेख आहे.

**"संघटनेच्या महासचिवांनी ही बाब मा. उच्च शिक्षणमंत्र्यांच्या लक्षात आणून दिली होती :** आमच्या संघटनेच्या महासचिवांनी दिनांक २० डिसेंबर २००८ रोजी एकदा व त्यानंतर १२ जानेवारी २००९ रोजी दुस-यांदा निवेदन देऊन, गेल्या अनेक वर्षापासून विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक नोकरशाहीच्या अहंकारी वृत्तीने पिडीत आहेत ही गोष्ट मा. उच्च शिक्षणमंत्र्यांच्या लक्षात आणून दिली होती. या दोनही निवेदनात अशी विनंती केली होती की,

" महाराष्ट्रामध्ये २० लाख सरकारी व निमसरकारी कर्मचारी व शिक्षक यांच्या वेतन पुनर्रचनेचा शासन निर्णय (ज्याबद्दल केन्द्र शासनाकडून कोणतेही अर्थसहाय्य उपलब्ध होत नाही) निर्गमित करण्यासाठीचे प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवत असतांना त्याच वेळी महाराष्ट्रामधील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या वेतन श्रेणीचे शासन निर्णय (ज्या बद्दल केन्द्र शासनाकडून ८० टक्के अर्थसहाय्य उपलब्ध होते) निर्गमित करण्यासाठीचे प्रस्ताव सुध्दा मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात येतील याची योग्य ती काळजी घेण्याच्या सूचना विभागाला देण्यात याव्यात. "

११. सोमवार, दिनांक २९ डिसेंबर २००८ रोजी विधानपरिषदेमध्ये मा. उच्च शिक्षणमंत्री व मा. राज्यमंत्री यांनी पुढील प्रमाणे आश्वासने दिलीत.:-

(अ) "वेतन आयोगाच्या ज्या शिफारशी आहेत त्याबाबत सर्व अधिकारी आणि कर्मचा-यांबाबत ज्यावेळी महाराष्ट्र शासन निर्णय घेईल त्यावेळी शिक्षक आणि उच्च शिक्षण विभागातील जे कर्मचारी आहेत यांचेही त्यांच्याबरोबर करुन घेऊ."

(ब) "एच.आर.डी. मंत्रालय आणि यु.जी.सी. जे आदेश काढील त्याचे महाराष्ट्र शासन पालन करील."

(क) "युजीसीकडून शिफारस आल्यानंतर, केंद्र सरकारकडून आदेश दिले जातील त्या आदेशांचे पालन केले जाईल."

१२. महासंघाच्या आंदोलनाच्या ठरावातील परिच्छेद ३.१०, ३.११ व ३.१२ पुढील प्रमाणे आहेत. :-

**३.१० केंद्राचा शासननिर्णय ३१ डिसेंबरलाच राज्याच्या मुख्य सचिवांना पाठविण्यात आला :** दिनांक ३१ डिसेंबर, २००८ रोजी केंद्र शासनाचा विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या वेतन सुधारणेचा शासन निर्णय निर्गमित झाला. केंद्र शासनाने दिनांक ३१ डिसेंबर, २००८ रोजीच सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहून हा शासननिर्णय जोडून पाठविला. केंद्र शासनाच्या प्रेस इन्फर्मेशन ब्युरोनी १२ फेब्रुवारी २००९ रोजी मानव संसाधन विभागाच्या वतीने एक जाहीर वृत्त प्रसारण काढले त्यात असे नमूद केले आहे की, "Copies of the said communication were endorsed, among others, **to Chief Secretaries of State Governments with clear advice in regard to what the State Governments are expected to do in order to be eligible for Central assistance......**"

**३.११ केंद्राने कळविले की आता कोणत्याही कागदपत्राची वाट पाहू नका :** या केंद्र शासनाच्या उपरोक्त प्रसारणामध्ये असेही नमूद करण्यात आलेले आहे की, "In view of this, no separate order is required to be issued to State Governments." त्यातच पुढे असेही नमूद करण्यात आलेले आहे की "The scheme contains a provision that the revised pay and applicable allowances as also arrears up to 40% of the total arrears could be paid to all eligible beneficiaries under the scheme, pending issuance of regulations by the UGC." सारांश काय तर महाराष्ट्र शासनाला केंद्र सरकारने स्पष्टपणे कळविले की, "तुम्ही याबाबतची कार्यवाही ताबडतोब सुरु करा. आता तुम्ही कोणत्याही नवीन कागदपत्रांची वाट पाहू नका. ८० टक्के अर्थसहाय्य देण्यास आम्ही तयार आहोत, राज्य शासनाने या वर्षात ४० टक्के थकबाकी देण्यासाठीची रक्कम आमचेकडून न्यावी व याबाबतची कार्यवाही ३१ मार्च, २००९ च्या आत पार पाडावी."

**३.१२ विद्यापीठ अनुदान आयोगाने कळविले अर्थसहाय्य उपलब्ध करुन घ्या, थकबाकी द्या :** विद्यापीठ अनुदान आयोगाने २८ फेब्रुवारी, २००९ रोजी सर्व राज्यांच्या शिक्षण सचिवांना पत्र लिहिले. त्याचा पत्र क्रमांक No.F.1.1-61/2009/PRC असा आहे. त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, "The Commission has received orders from the Government of India, Ministry of Human Resource Development, Department of Higher Education, New Delhi vide letter No. 1-32/2006-U.II/U.I (i) and 1-32/2006-U.II/U.I (ii) dated 31st December, 2008 on the above subject and to say that the **State Government may take action to adopt the above Government of India scheme for State Universities and Colleges and payment of pay scales, enhancement of retirement age and release of 40% of the arrears during the current financial year in accordance with these provisions.**" दिनांक ३१ मार्च, २००९ च्या आत ४० टक्के थकबाकीची रक्कम घेवून जावी असे स्पष्टपणे केंद्र शासनाने कळविले, विद्यापीठ अनुदान आयोगाने कळविले, आमच्या या राज्यातील नोकरशाही पूर्णपणे झोपलेली आहे, त्यांना याबाबत काही करावेसे वाटतच नाही. विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना **दिली जाणारी ही वागणूक मंत्रिमंडळाच्या निर्णयाचा अधिक्षेप करणारी व मंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनांचा भंग करणारी आहे, असे या कार्यकारी मंडळाचे मत आहे."**

१३. दिनांक ३१ डिसेंबर, २००८ रोजी केंद्र शासनाचा विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या वेतन सुधारणेचा शासन निर्णय निर्गमित झाला. या शासननिर्णयाप्रमाणे या वेतन सुधारणा अमलात आणल्यामुळे येणा-या जादा अर्थभाराच्या ८० टक्के अर्थसहाय्य केंद्रशासन राज्य शासनाला देणार आहे. पण त्यासाठी केंद्र शासनाची प्रमुख अट या शासननिर्णयाच्या परिच्छेद ८ (जी) मध्ये पुढील प्रमाणे आहे :- "Payment of Central assistance for implementing this Scheme is also subject to the condition that the entire Scheme of revision of pay scales, together with all the conditions to be laid down by the UGC by way of Regulations and other guidelines shall be implemented by State Governments and Universities and Colleges coming under their jurisdiction as a composite scheme without any modification ....."

१४. सन १९९९ मध्ये सुद्धा तोंडाला पाने पुसण्याचा असाच प्रकार घडला होता. राज्याच्या मा. उच्च शिक्षण सचिवांनी संघटनेच्या अध्यक्षांना दिनांक ६ डिसेंबर १९९९ रोजी "विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेली नवीन वेतनश्रेणी लागू करणेबाबत. एमफक्टो संघटनेच्या पदाधिकाऱ्यांबरोबर बैठक." या विषयावर एक पत्र (क्र.एनजीसी-१२९८/(४६१९)/विशि-४) लिहून असे कळविले होते की,

"उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने माझ्या दालनात आज दिनांक ६.१२.१९९९ रोजी चर्चा केल्यानुसार विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांना ५ व्या वेतन आयोगावर आधारित विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेल्या वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा निर्णय शासनाने दिनांक २४.११.१९९९ **रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतला आहे व त्यास प्रसिद्धी देण्यांत आली आहे. आपणास या मिटिंगमध्ये वाचून दाखविलेल्या वेतनश्रेणी खालीलप्रमाणे आहे.** सध्या अस्तित्वात असलेल्या वेतनश्रेणीशी समकक्ष असणाऱ्या वेतनश्रेणी खालीलप्रमाणे

आहेत.” (खाली देण्यात आल्या होत्या)

**१५.** त्यावर दिनांक ७ डिसेंबर १९९९ रोजी महासंघाच्या कार्यकारी मंडळाची बैठक होवून त्यात पुढील ठराव मंजूर करण्यात आला.

“Resolution adopted at the executive Committee of the MFUCTO at its meeting held in mumbai on 7th December 1999

1. After taking into consideration the discussion with the secretary, Higher & Technical Education, Government of Maharashtra (Shri.M.R.Patil) that the Executive Committee of the MFUCTO had on 6th December 1999 in his chamber at Mumbai, and after careful consideration of the contents of the letter dated 6th December 1999 received from him, this meeting of the MFUCTO held on 7th December 1999, **is of the considered opinion that except going on indefinite strike, there is no alternative left for the MFUCTO,** and therefore it resolves to reiterate

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)**

*Registered under the Trade Union Act 1926, Reg.No.By-II-8162 of 1985*

Affiliated to the All India Federation of University and College Teachers' Organisations (AIFUCTO)

*Vidyapeeth Vidyarthi Bhavan, 'B' Road, Churchgate, Mumbai-400 020.*

## महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या शनिवार, दिनांक १८ जुलै २००९ रोजी झालेल्या बैठकीत सम्मत झालेला ठराव

**मुंबई, दिनांक १८ जुलै २००९ :** ४ एप्रिल २००० पूर्वी नियुक्त झालेल्या अधिव्याख्यात्यांना नेट सेट लागू राहणार नाही असे खुद्द विद्यापीठ अनुदान आयोगाचेच आदेश आहेत. त्यामुळे ४ एप्रिल २००० पूर्वीच्या शिक्षकांची सेवा नेमणूक झाल्यापासून धरण्यात येईल, असे सभागृहात मान्य करण्यात आले. त्याप्रमाणे आदेश सुध्दा काढण्यात आले. पण **सचिवालयाने त्यामध्ये खोडसाळपणा केला, “पात्रतेच्या बाबतीत ४ एप्रिल २००० चे नोटीफिकेशन स्पष्ट आहे” असे आदेश त्यांनी संचालकांना दिनांक १६ जून २००९ रोजी दिले. त्यावर संचालकांनी, “जे स्पष्ट आहे असे सचिवांनी म्हटले, त्याबाबत मला शासनाकडून स्पष्टीकरण पाहिजे”** असे संघटनेला लेखी लिहून दिले. चर्चा सुरू झाल्यानंतर दोघांचा हा वाद आमच्या समोर व मंत्री महोदयासमोर बराच वेळ चालू होता. शेवटी एकदा निर्णय झाला व ४ एप्रिल २००० पूर्वी नेमण्यात आलेल्या शिक्षकांची सेवा नेमणूकीच्या दिनांकापासून धरली जाईल असे ठरले होते, तसेच वाक्य ॲग्रीमेंट मध्ये घेण्याचेही ठरले. **“या कामासाठी मला दोन दिवस वेळ लागेल” असे सचिव म्हणाले.** त्यानंतर दोन दिवस निघून गेलेत पण हा दोन ओळीचा आदेश त्यांनी १८ जुलै रोजीच्या बैठकीत सुद्धा ठेवला नाही. दिनांक **३ ऑगस्ट २००१** रोजी तत्कालीन मा. उच्च शिक्षण मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यांनी **“विद्यापीठ अनुदान आयोगाने सन १९९१ मध्ये राज्य शासनास पाठविलेले विनियम (रेग्युलेशन) राज्य शासनाने असाधारण राजपत्रात प्रसिद्ध करणे आवश्यक होते तसे केल्यास ते कायदेशिर विलेख (लिगल इन्स्ट्रूमेंट) ठरले असते. तथापि, राज्य शासनाने या संदर्भात शासन निर्णय निर्गमित केला ही राज्य शासनाची चूक झाली आहे”** हे सभागृहात कबूल केले त्यानंतर स्वतः मा. विद्यमान उच्च शिक्षण मंत्री श्री. राजेश टोपे यांनी विधान परिषदेत सुद्धा हे पुढील शब्दात मान्य केले. **“अधिव्याख्यात्यांना नेट-सेटची परीक्षा १९९१ ला कम्पलसरी करण्यात आली होती परंतु लीगल इन्स्ट्रुमेंटच्या माध्यमातून किंवा स्टॅट्युटमध्ये किंवा व्हाईस चॅन्सलरच्या डायरेक्शन्समध्ये किंवा गव्हर्नमेन्टच्या कोड मध्ये यासंबंधीचा उल्लेख न केल्यामुळे नेट सेटची परीक्षा कायद्याने लागू करता आली नाही.”** ही राज्य शासनाची चूक झाली आहे ही गोष्ट शासनाकडून वारंवार मान्य केली जाते. **गेल्या दोन दिवसांत आमच्याशी झालेल्या चर्चेत सुध्दा त्यांनी ही गोष्ट मान्य केली. मात्र ती चूक दुरूस्त करण्याची कोणतीही कारवाई होऊ नये हे दुःखद आहे.**

२. केंद्र शासनाची वेतन सुधारणेची योजना **“समग्र योजना”** म्हणून अमलात आणली तरच केंद्र शासनाचे ८० टक्के अर्थसहाय्य मिळू शकते. **“ही समग्र योजना आम्ही अमलात आणू”** हे एक वाक्य सुध्दा मान्य करायला शासन तयार नाही. त्या समग्र योजने मध्ये त्यांना अनेक बदल करावयाचे आहेत. ते बदल कोणते? ते निदान सांगा तरी. असे आम्ही विचारले असता ते कोणते बदल आहेत हे सांगण्यास सुध्दा कोणी तयार नाही. श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी १९९९ मध्ये काही बदल सांगितले होते. त्यातील तीन बदलांबाबत त्यावेळी चर्चेनंतर सहमती झाली होती. तुम्ही चार सांगा, पण निदान सांगा तर खरे ! म्हणजे ते बदल योग्य की अयोग्य हे आम्ही सांगू पण त्याबाबत ते काहीही सांगायला तयार नाहीत. **विशेष असे की, १.१.२००६ पासून ही योजना अमलात आणली जाईल हे वाक्य सुध्दा नमुद करायला सचिव तयार नाहीत.**

३. **दिनांक १५ जुलै रोजी मा. मंत्री महोदयाच्या उपस्थितीत बैठक सुरू झाली.** “तुम्ही लोकांनी एकदम आंदोलन सुरू करण्यापेक्षा आम्हाला अगोदर कल्पना दिली असती, तर चर्चेतून मार्ग काढता आला असता.” अशी शासनातर्फे चर्चेला सुरूवात झाली. त्यावर ताबडतोबच महासंघाच्या अध्यक्ष व सचिवांनी असे सांगितले की “महासंघाने १९ एप्रिल २००९ रोजी आंदोलनाचा जो सविस्तर ठराव संमत केला तो दुसऱ्याच दिवशी म्हणजे २० एप्रिल २००९ रोजी निवेदनाद्वारे मा. सचिव, उच्च शिक्षण व मा. मंत्री, उच्च शिक्षण यांना सादर करण्यात आला, त्याची पोच आमच्या जवळ आहे” असे महासंघातर्फे सांगण्यात आले. त्यावर सचिवांनी **“खरोखरच निवेदन आम्हाला मिळाले नाही”** असे सांगितले. वस्तुतः ते १०० टक्के असत्य बोलत होते. कारण गेल्या चार महिन्यात अनेक निवेदने देण्यात आली, काही निवेदने थेट देण्यात आली, तर काही सहसंचालकामार्फत व काही कलेक्टरांमार्फत देण्यात आलीत. काही निवेदने अध्यक्ष आणि सचिवांनी व्यक्तिशः सोपविली, काही निवेदने शेकडो लोकांच्या मोर्चाने नेऊन दिलीत. सर्वांची पोच संघटनेजवळ उपलब्ध आहे. दिनांक १५ जुलै २००९ रोजी सचिवांनी उपरोक्त उद्‌गार काढले तेव्हा आम्हाला आश्चर्य वाटले. पण ठिक आहे, चर्चेला सुरूवात होत आहे म्हणून आम्ही तो मुद्दा ताणला नाही. **आज दिनांक १८ जुलै २००९ रोजी सुध्दा त्यांनी आपल्याला आंदोलनाबाबतचे निवेदन मिळालेच नाही,** अशी सुरूवात केली, ही अत्यंत संतापजनक सुरूवात होती. “याबाबतची सूचना देणारे एक सविस्तर निवेदन महासंघाचे अध्यक्ष व सचिवांनी २० एप्रिल २००९ रोजी सादर केले काय?” या प्रश्नाला सभागृहात दिनांक ११ जून २००९ रोजी शासनातर्फे **“होय”** (ता. प्र. क्र. ५०१५२) असे उत्तर दिले आहे.

४. आज दिनांक १८ जुलै २००९ रोजी सकाळी ११.०० वाजता चर्चेसाठी बोलविण्यात आले होते. मात्र दोन दिवस उलटून गेले तरी दोन ओळीचे करेक्शन तयार नव्हते. तसेच मंत्री महोदय उपस्थित नव्हते. हा साराच प्रकार उद्वेगजनक होता.

**५. उपरोक्त घटनाक्रम लक्षात घेता “बेमुदत काम बंद आंदोलन” व दिनांक २० जुलैपासून सुरू करावयाचा आंदोलनाचा पुढील कार्यक्रम पूर्वी ठरल्याप्रमाणे ठामपणे राबविण्यात येईल.**

| (C.R.Sadasivan) | (E.H.Kathale) |
|---|---|
| President | General Secretary |

**MFUCTO**

its decision to start the indefinite strike from 8th December 1999.

"2. The above decision may however, **be reconsidered by the Executive Committee of the MFUCTO if written document is received on the basis of discussion with the Hon'ble Minister** for Higher & Technical Education, Maharashtra State."

१६. त्याच दिवशी दिनांक ७ डिसेंबर १९९९ रोजी तत्कालीन उच्च शिक्षण मंत्री मा. श्री. दिलिप वळसे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली महासंघाशी चर्चा झाली या चर्चेत जे उभयपक्षी मतैक्य पत्र नोंदविण्यात आले त्यातील पुढील मजकूर पहा :-

"The Government of India have, after taking into consideration the recommendations of University Grants Commission, decided to revise the pay scales of teachers in the Central Universities and Colleges, vide their letter dated 27th July, 1998. 6th November, 1998 & UGC's notification dated 24th December, 1998 informed the State Government of the same for consideration.

Government of Maharashtra has **considered** these aforesaid letters and notification and **has taken the decision as follows :-**

The Government of India's suggestions on "Revision of payscales of teachers in Universities and Colleges following the revision of payscales of Central Government employees on the recommendations of 5th Central Pay Commission" dated the 27th July, 1998 amended vide a letter dated 6th November, 1998 including UGC's notification dated 24th December, 1998 **would be implemented by the State Government with recommended scales of pay, as a composite scheme** with effect from 1.1.1996 with the following modifications :- (येथे तीन मॉडीफीकेशन्स आहेत) हा मजकूर काळजीपूर्वक वाचला तर शासनाने काय विचारात घेतले व काय निर्णय घेतले याचा स्पष्ट उल्लेख सुद्धा त्यामध्ये आहे. तीन बाबी मान्य नाहीत हेही त्यात आहे. मा. उच्च शिक्षण मंत्री यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या उपरोक्त मतैक्यपत्रातील ठळक अक्षरामध्ये देण्यात आलेल्या इंग्रजी शब्दासाठी मराठीमध्ये पर्यायी शब्द अस्तित्वात आहेत हे आमच्या उपसचिवांना ठाऊक नाही असे दिसून येते.

१७. चौथ्या वेतन आयोगाच्या वेळी मा. श्री.शरदराव पवार हे राज्याचे मुख्यमंत्री असतांना त्यांनी महासंघाच्या कार्यकारी मंडळाशी सतत ५ दिवस चर्चा करुन दिनांक १८ जानेवारी १९८९ रोजी "AGREEMENT REACHED IN THE DISCUSSIONS OF THE REPRESENTATIVES OF THE MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY AND COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO) WITH THE CHIEF MINISTER OF MAHARASHTRA " या मथळ्याचे एक मतैक्यपत्र तयार केले. त्याचा पहिलाच परिच्छेद पुढील प्रमाणे आहे. :- "The State Government **has carefully considered** the Government of India's instructions regarding revision of pay scales for University and College teachers and other relevant guidelines and **has decided to implement them in the following manner :**

(1) The Government of India suggestions on revision of pay scales for teachers in Universities and Colleges, dt. 17th June, 1987 as amended by subsequent agreement dt. 4th and 5th Sept. 1987 and the Government of India's suggestions dt. 22nd July, 1988 **would be implemented by the State Government with the recommended scales of pay, including the element of promotions involved there in as a composite scheme w.e.f. 01.01.1986,** except that in respect of the scale of Rs. 4500-7300 the matter will be considered further by the Government." हे मतैक्यपत्र काळजीपूर्वक वाचले तर त्यामध्ये काय विचारात घेतले आहे. काय निर्णय घेतले हे स्पष्ट नमूद आहे. एक बाब नंतर ठरवू असे आहे.

१८. प्राथमिक शिक्षकांपासून तर कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांपर्यंत (उपमुख्याध्यापक व मुख्याध्यापक यांच्यासह) सर्व स्तरावरच्या शिक्षकांना सहावा वेतन आयोग लागू करण्याची बाब हकीम समितीने स्पष्टपणे फेटाळून लावली हा ताजा इतिहास आहे. त्यांच्या अहवालाच्या परिच्छेद ३.९.२ मध्ये त्या समितीने स्पष्टपणे असे म्हटले आहे की, "या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन समिती अशा निष्कर्षाप्रत आली आहे की, शिक्षकीय पदांबाबत सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारसी जशाच्या तशा स्विकारणे शक्य होणार नाही". मा. मंत्रिमहोदयांबरोबर महासंघाशी दिनांक १५ व १६ जुलै रोजी जी चर्चा झाली त्यामध्ये "३१ डिसेंबरच्या केंद्राच्या शासन निर्णयातील व्यवस्था एक समग्र योजना म्हणून महाराष्ट्रात लागू केली जाईल" येवढ्या एका वाक्याचे मतैक्य करायला सुद्धा सचिव तयार नव्हते. त्यावेळीच महासंघाच्या कार्यकारी मंडळाला काहीतरी काळेबेरे आहे हे कळून चुकले होते. श्री. जाधव यांच्या पत्रातील उपरोक्त एका वाक्याने मांजर बाहेर आले आहे. हकीम समितीचा अहवाल मंत्रिमंडळाचा निर्णय होईपर्यंत गुप्त ठेवण्यात आला. गुप्तता आली की कटकारस्थान आले. एका मोठ्या कारस्थानाचा भाग म्हणून शिक्षकांशी व संघटनांशी चर्चा न करता गुप्तपणे मंत्रिमंडळात निर्णय करवून घेण्यात विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना 'निमहकीम फॉर्म्युला' लावण्याचा नोकरशाहीचा विचार असेल तर तो जबरदस्त संघर्षाचा विषय आहे.

१९. शासनाच्या पत्राच्या परिच्छेद २ मध्ये नेट-सेट बाबत केलेली वा शासन करित असलेली कारवाई कळविली आहे. या परिच्छेद २ मधिल प्रत्येक वाक्य हे अनभ्यासावर आधारित आहे.

२०. या पत्राच्या दुसऱ्या परिच्छेदातील पहिलेच वाक्य "**महाराष्ट्रातील अकृषि विद्यापीठे व संलग्नीत महाविद्यालये यांनी सन १९९१ ते ९९ या कालावधीत बरेचसे बिगर नेट सेट उमेदवार अधिव्याख्याता म्हणून नेमलेले आहेत.**" असे आहे. या संदर्भात आंदोलनाच्या ठरावाच्या परिच्छेद

***मंत्रिमहोदयांनी दिलेली आश्वासने व सभागृहातील चर्चा याविषयी ही तुच्छतेची वागणूक ज्या मर्यादेपर्यंत मा. मंत्रिमहोदयांना सहन करता येईल त्या मर्यादेपर्यंत त्यांनी ती अवश्य सहन करावी पण महाराष्ट्रातील तमाम प्राध्यापकांनी सुद्धा ती सहन करावी असा आग्रह त्यांनी धरु नये.***

*दिनांक २६ जुलै २००९ रोजी महासंघाच्या कार्यकारी मंडळाने सम्मत केलेल्या ठरावातील परिच्छेद ३० पहा*

२.२३ मध्ये महासंघाने आपली भूमिका शासनाला कळविली आहे. ती पुढील शब्दात :-

"Instead of firmly introducing NET/SET as a compulsory qualification at recruitment level by the competent legal instrument such as Standard Code, the State Govt. was constantly introducing NET/SET qualification by informal instruments and was simultaneously enjoying the benefits of not introducing it. Since NET/SET was not inducted as a compulsory qualification at the recruitment level by legal instrument, hundreds of candidates without NET/SET, were recruited from 1991 till the cut-off date i.e. 28.12.1999. Advertisements were approved, Selections were made, approvals were granted by the university and; because it was the perfectly lawful recruitment in the teaching cadre, 100% salary grants were paid by the State Govt. in respect of such lawfully recruited teachers, year after years and continued to be so paid even today."

**२१.** महासंघाच्या उपरोक्त भूमिकेतील प्रत्येक शब्द बिनचूक व कायदेशीर आहे. "आंदोलनाचा ठराव" वाचायला मा. मंत्रिमहोदयांना किंवा मा. सचिवांना वेळ मिळाला नाही हे आपण समजू शकतो पण महासंघाला पत्र लिहितांना या उपसचिवांनी थोडा जरी वेळ काढला असता तर "ह्या नेमणूका पूर्णपणे कायदेशिर आहेत" असे वाक्य त्यांच्या लेखणीतून बाहेर पडले असते. एवीतेवीसुद्धा १७-१८ वर्षानंतर शासनाने हे बेकायदेशीर आहे असे म्हणणे म्हणजे आत्मनिंदा केल्यासारखे होईल.

**२२.** नेट-सेट ची पात्रता कायदेशीररित्या डिसेंबर १९९९ पर्यंत महाराष्ट्रात लागूच करण्यात आली नव्हती हे खुद्द मंत्रिमहोदयांनीच मान्य केल्याचे आंदोलनाच्या ठरावाच्या परिच्छेद २.९, २.१० व २.११ मध्ये शासनाच्या लक्षात आणून देण्यात आलेले आहे. ते पुढील शब्दात :-

"ही चूक झाली असेल तर आम्ही दुरुस्त करु असे मा. मुख्यमंत्र्यांनी दिनांक १७ मार्च १९९४ रोजी सभागृहात सांगितले होते. तिथून सात वर्षानी दिनांक ३ ऑगस्ट २००१ रोजी ही चूक झालेली आहे ही गोष्ट मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी पुढील शब्दात मान्य केली :- "सभापती महोदय, ही बाब खरी आहे की, १९९१ साली यु.जी.सी.ने रेग्युलेशन्स राज्य सरकारला पाठविले होते. त्यानंतर राज्यसरकारने हे रेग्युलेशन्स विद्यापीठांना पाठवत असतांना ते **असाधारण राजपत्रात** प्रसिध्द करुन पाठवावयास पाहिजे होते. तसे करण्यात आले असते तर ते लीगल इन्स्ट्रुमेन्ट ठरले असते. **परंतु राज्य सरकारकडून त्या वेळी ही चूक झालेली आहे.** १९९१ मध्ये जी.आर.काढून राज्य सरकारने विद्यापीठांना हे आदेश पाठविले होते. राज्य सरकारचा हा जी.आर.जरी असला तरी लीगल इन्स्ट्रुमेन्ट नसल्यामुळे विद्यापीठांनी आपल्या स्टॅट्युटसमध्ये बदल केलेले नसतील."

**महाराष्ट्रात नेटसेट ही पात्रता परीक्षा केंव्हा सक्तीची झाली ते सुद्धा मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी सभागृहात सांगितले :** विधीवतरित्या नेटसेटची पात्रता १९९९ पर्यंत महाराष्ट्रात लागूच करण्यात आली नव्हती, एवढेच सांगून मा. उच्च शिक्षण मंत्री थांबले नाहीत तर ती केंव्हा पासून लागू करण्यात आली, हे सुद्धा त्यांनी त्याच दिवशी सभागृहात सांगितले. ते पुढील शब्दात :- "ज्यावेळी पाचवा वेतन आयोग लागू करण्याची वेळ आली त्यावेळी दिनांक ११-१२-१९९९ रोजी मी शिक्षण मंत्री होतो त्यावेळी या संदर्भात विहित पध्दतीने विद्यापीठांना आदेश देण्यात आले होते. एवढेच नव्हे तर विद्यापीठ कायद्यात सुध्दा त्या संदर्भात आपण काही दुरुस्ती केली होती. त्याचा परिणाम असा झाला की १९९१ साली राज्य सरकारने आदेश देऊनही विद्यापीठाने आपल्या स्टॅट्युटसमध्ये बदल केलेले नव्हते. आता १९९९ मध्ये राज्य सरकारने आदेश दिल्यानंतर सर्व विद्यापीठांनी आपल्या स्टॅट्युटसमध्ये बदल केलेले आहेत."

**ही चुक झालेली आहे ही गोष्ट विद्यमान मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी सुद्धा मान्य केली. :** "सभापती महोदय,... अधिव्याख्यात्यांना नेट सेट ची परीक्षा १९९१ ला कम्पलसरी करण्यात आली होती परंतु लीगल इन्स्ट्रुमेन्टच्या माध्यमातून किंवा **स्टॅट्युटमध्ये** किंवा व्हाईस चॅन्सेलरच्या **डायरेक्शन्समध्ये** किंवा गव्हर्नमेन्टच्या **कोड मध्ये** यासंबंधीचा उल्लेख न केल्यामुळे नेट सेटची परीक्षा कायद्याने लागू करता आली नाही" असे मा. विद्यमान उच्च शिक्षणमंत्र्यांनी दिनांक १७ डिसेंबर २००८ रोजी सभागृहात पुन्हा सांगितले.

आंदोलनाच्या ठरावातील मंत्र्यांनीच केलेली विधाने नमूद असलेला हा अत्यंत महत्वपूर्ण मजकूर वाचण्यास राज्याच्या मा. उच्च शिक्षणमंत्र्यांना व उच्च शिक्षण सचिवांना वेळ मिळाला नाही हे आपण एकदा समजू शकतो पण महासंघाला पत्र लिहिण्यापूर्वी उपसचिवांनी थोडा जरी वेळ काढला असता तर "**या नेमणूका पूर्णपणे कायदेशिर आहेत**" असे वाक्य त्यांच्या लेखणीतून पाझरले असते.

**२३.** उपसचिवांच्या पत्राच्या परिच्छेद दोन मधिल दुसरे वाक्य पुढील प्रमाणे आहे. :-

**"अशा अधिव्याख्यात्यांना नेट सेट अर्हतेपासून सूट देण्यासाठीचे प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनेनुसार आणि मा. न्यायालयांच्या निर्णयानुसार संबंधित विद्यापीठांनी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविलेले/पाठवावयाचे आहेत."**

**२४.** न्यायालयाच्या निर्णयानुसार हे प्रस्ताव पाठवावयाचे होते ही गोष्ट या निमित्ताने शासनाला कळली हे फारच उत्तम झालेले आहे. मात्र उपसचिवांनी न्यायालयाचे हे निर्णय अर्धवटच वाचलेले दिसतात. आंदोलनाचा ठराव वाचण्यास मा. मंत्रिमहोदयांना व मा. सचिवांना वेळ मिळाला नाही ही गोष्ट आपण समजू शकतो पण निदान उपसचिवांनी हा ठराव काळजीपूर्वक वाचला असता तर त्याच्या परिच्छेद २.१५ व २.१६ मध्ये त्यांना न्यायालयाच्या निर्णयाविषयीचा पुढील महत्वपूर्ण उल्लेख आढळून आला असता.

**"पुढच्या बारा महिन्यातील नेट-सेटची प्रकरणे पाठवा असे मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने सांगितले तर यांनी सोबतच मागच्या १२ वर्षातील प्रकरणे पाठविली. :** मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने २००१ च्या याचिका क्रमांक ५०२२ मध्ये दिनांक २० फेब्रुवारी २००२ रोजी दिलेल्या निकालात स्पष्टपणे असे म्हटलेले आहे की :-

"We also hold that the cases of candidates appointed **from 12th October, 1999 till 18th October, 2000** are required to be examined so as to

***नागपूर अधिवेशनात दिनांक १७ डिसेंबर २००८ रोजी व मुंबई अधिवेशनांत १२ जून २००९ रोजी या प्रश्नाच्या संपूर्ण अभ्यासावर आधारित जी मुदतबंद ठाम आश्वासने मा. मंत्रिमहोदयांनी सभागृहात दिलीत, त्यातील एकाही आश्वासना बाबतचे आदेश काढण्यात आले नाहीत या प्रत्यक्ष कृतिवरुन मा. मंत्रिमहोदयांनी या तुच्छतापूर्ण वागणूकीचा बोध घ्यावा,***

*दिनांक २६ जुलै २००९ रोजी महासंघाच्या कार्यकारी मंडळाने सम्मत केलेल्या ठरावातील परिच्छेद ३० पहा*

ascertain the applicability of the first proviso to clause 2 of the 1991 Regulations as well as 2000 Regulations before their services are sought to be terminated by the respective universities and/ or colleges/ institutions."

**मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने १०४ प्रकरणे पाठवा असे सांगितले तर यांनी हजारो प्रकरणे पाठविली.** : मा. मुंबई उच्च न्यायालयाने २००१ च्या याचिका क्रमांक ५७८२मध्ये दिनांक १४ एप्रिल २००२ रोजी दिलेल्या निकालात स्पष्टपणे असे म्हटलेले आहे की :- "In the event the UGC takes decision adverse to the interests of teachers the management and the University are directed not to act upon it for a **period of four weeks from the date of communication** by UGC to the college through the University. **In the result the petitions mentioned in the schedule to this order are disposed of by this order.**.... Except those petitions mentioned to be heard separately, rest of the petitions mentioned in the schedule are covered by this order and are accordingly disposed." या निर्णयात शेवटी **परिशिष्ट** देण्यात आले असून त्या **परिशिष्टात दिलेल्या १०४ प्रकरणांची छाननी** करुन विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्णय घ्यावा असे नमूद असतांना त्या निकालाचे निमित्त करुन हजारो प्रकरणांना बॅगा भरभरून आमच्या नोकरशाहीने महाराष्ट्रातून दिल्लीला कां पाठविले हे समजण्या पलिकडचे आहे."

२५. यासंदर्भात शासन काय उपाययोजना करणार आहे? याबाबतचा मोठा हास्यास्पद मजकुर शासनाच्या या पत्रामध्ये अंतर्भूत आहे, तो पुढील प्रमाणे :-

**"(i) राज्य शासन विद्यापीठ अनुदान आयोगाला व केंद्र शासनाला प्रलंबित प्रकरणे त्वरित निकाली काढण्यासाठी विनंती करील."**

शासनाच्या वतीने सभागृहात जी आश्वासने देण्यात आली त्याची अम्मलबजावणी करणारे आदेश काढायला सचिव तयार नाहीत, मात्र विद्यापीठ अनुदान आयोगाकडे राज्यशासन विनंती करणार आहे. आंदोलनाचा जो ठराव संघटनेने शासनाला सादर केला आहे, त्याच्या परिच्छेद २.१६ मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाने २००१ च्या याचिका क्रमांक ५७८२मध्ये दिनांक १४ एप्रिल २००२ रोजी दिलेल्या निकालाचा उल्लेख आहे. मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयात विद्यापीठ अनुदान आयोगाला पुढील प्रमाणे आदेश देण्यात आलेले आहेत :-

"The managements where they are directed to approach the UGC for relaxation shall do so within **four months** from the date of the order of this court. The concerned University then process the same and forward them to UGC. This be done by the concerned Universities within **four months** of receiving the requests from the managements. **The UGC will have then four months** time to process the applications and request so made and then take decision."

२६. मा. मंत्रिमहोदयांना व मा. सचिवांना मा. उच्च न्यायालयाचा हा निर्णय वाचण्यासाठी कामाच्या गडबडीत वेळ मिळाला नाही हे आपण समजू शकतो. पण निदान उपसचिवांनी तरी असे हास्यास्पद वाक्य लिहिण्यापूर्वी हायकोर्टाचा हा निर्णय पहायला हवा होता, असे संघटनेला वाटते. १४ एप्रिल २००२ रोजी मा. उच्च न्यायालयाने विद्यापीठ अनुदान आयोगाला चार महिन्यात निर्णय करण्याचे आदेश दिलेले असतांना या पार्श्वभूमिवर आता सात वर्षांनी **राज्य शासन त्वरीत निर्णय घेण्यासाठी आयोगाला विनंती करणार आहे. हे वाक्य म्हणजे या शतकातील क्रमांक एकचे विनोदी वाक्य असा दर्जा या वाक्याला मिळाला तर आश्चर्य वाटायला नको.**

२७. मोघम व पोकळ आश्वासन देणारे असे आणखी एक अतिविनोदी व हास्यास्पद वाक्य उपसचिवांच्या या पत्रामध्ये आहे ते पुढील प्रमाणे :-

**"(ii) विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सूट मिळाल्याचे पत्र विद्यापीठास प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून शक्यतो ३० दिवसाच्या आंत ती प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे शिबीर आयोजित करुन कार्यवाही पूर्ण करण्यात येईल."**

पुढे आवश्यक ती कारवाई करण्याचे आश्वासन देणाऱ्या उपसचिवांनी अशा प्रकरणी मागे काय उजेड पाडण्यात आला? याबाबतीत अंधारात रहावे हा म्हणजे अतिविनोदच झाला. ५ नोव्हेंबर २००८ च्या पत्रान्वये नागपूर विद्यापीठातील ८३७ शिक्षकांच्या प्रकरणी विद्यापीठ अनुदान आयोगाने नेटसेट पात्रतेपासून सुट दिली. दिनांक १७ डिसेंबर २००८ रोजी नागपूर अधिवेशनांत लक्षवेधी सूचना होती. मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी नागपूर विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांना बोलावून **"एक महिन्यात यांचे प्लेसमेंट पूर्ण करा"** अशी सूचना केली. तसे त्यांनी सभागृहात सांगितले. त्याप्रमाणे त्या विद्यापीठाने सर्वांची स्थाननिश्चिती केली. पुढे काय झाले? पुढे काहीच झाले नाही. याचे कारण मंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे सचिवांनी कारवाई केली नाही. यापेक्षा वेगळे कोणतेहि नाही. मा. मंत्रिमहोदयांनी १७ डिसेंबर २००८ रोजी सभागृहात असे सांगितले की,

"सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यानी जे तीन प्रश्न विचारलेले आहे त्या बाबत मी शासनाच्या वतीने सांगू इच्छितो की, या सदंर्भात एक जी.आर. काढणे आवश्यक आहे **तेव्हा या अधिवेशनाचा कालावधी संपण्याच्या अगोदर हा जी. आर. काढण्यात येईल जर २४ तारखेला अधिवेशन संपणार असेल तर त्या अगोदर जी. आर. काढण्यात येईल.....** विद्यापीठाला सुध्दा सभागृहाच्या भावना कळविण्यात येतील तसेच **हे काम एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावे अशी सूचना विद्यापीठाला देण्यात येईल."**

२४ डिसेंबरच्या आत निघाला काय हा शासन आदेश? एप्रिल २००० नंतर लागलेल्या नेट-सेट मुक्त अधिव्याख्यात्यांची सेवा पहिल्या दिवसापासून धरण्यात येण्याचे आदेश निघाले आहेत पण **एप्रिल २००० पूर्वी लागलेल्या अधिव्याख्यात्यांची सेवा नेमणूकीच्या पहिल्या दिवसापासून धरण्याचे आदेश अजूनही निघालेले नाहीत. केवढा हा दुष्टावा.**

२८. १२ जून २००९ रोजी लक्षवेधी सूचनेवरील मा. मंत्रिमहोदयांच्या निवेदनातील "तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ४.४.२००० च्या अधिसूचनेद्वारे निर्गमित केलेले विनियम २००० मध्ये सुध्दा वरील प्रमाणे शैक्षणिक अर्हता/ पात्रतेची अट अंतर्भूत करून सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांना असेही सूचित करण्यात आले आहे की, यापुढे दिनांक ४.४.२००० नंतर राज्यातील महाविद्यालयात/विद्यापीठात अधिव्याख्याता पदावर बिगर अर्हताधारक उमेदवारांच्या नियुक्त्या कोणत्याही परिस्थितीत करू नये." हे वाक्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सभागृहात वाचून दाखविले व हे वाक्य खरे आहे पण त्याच वाक्याच्या पुढे त्याच अधिसूचनेत अशीही तरतूद आहे की, **"यथोचितरित्या अस्तित्वात आलेल्या निवड समितीमार्फत या नोटीफिकेशनपूर्वी ज्यांची निवड झालेली आहे आणि त्यावेळी अस्तित्वात**

***राज्य शासन त्वरीत निर्णय घेण्यासाठी आयोगाला विनंती करणार आहे. हे वाक्य म्हणजे या शतकातील क्रमांक एकचे विनोदी वाक्य असा दर्जा या वाक्याला मिळाला तर आश्चर्य वाटायला नको.***

*दिनांक २६ जुलै २००९ रोजी महासंघाच्या कार्यकारी मंडळाने सम्मत केलेल्या ठरावातील परिच्छेद २५ व २६ पहा*

**असलेली किमान पात्रता जो धारण करतो, त्या शिक्षकाला नेट-सेटच्या पात्रतेचा नियम लागू राहणार नाही"** हे लक्षात आणून दिले व त्यानंतर ते नोटीफिकेशन निघण्यापूर्वी सेवेत आलेल्या शिक्षकांची सेवा स्थाननिश्चितीच्या प्रयोजनार्थ नेमणुकीच्या दिनांकापासून धरावी लागेल. तशी सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिली जाईल काय? अशा प्रकारची विचारणा केली असता मा. मंत्रिमहोदयांनी "होय" असे उत्तर दिले व आदेशाची प्रत सोमवारी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल हे मान्य केले पण तशी ती ठेवली नाही.

२९. मंगळवार, दिनांक १६ जून २००९ रोजी इतर कारणामुळे सभागृहात शेवटी शासनाने १६ जून २००९ रोजी आदेश काढून उच्च शिक्षण संचालकांना "**विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. ४.४.२००० रोजी अधिसूचना प्रसिद्ध करून नेट/सेट अर्हतेसंबंधात स्पष्टता केलेली आहे,**" असे कळविले आहे. मा. उच्च शिक्षण संचालकांनी अशी भूमिका घेतली की, "**१६ जून २००९ च्या पत्रामध्ये ४.४.२००० नंतर नियुक्ती दिलेल्या अधिव्याख्यात्यांच्या बाबत काय कार्यवाही करावी याच्या स्पष्ट सूचना आहेत व त्या अनुषंगाने संचालनालयाच्या स्तरावरून योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.**" मात्र "दि. १९.९.९१ ते ११.१२.९९ या कालावधीत लागलेल्या अधिव्याख्यात्यांच्या सेवा स्थाननिश्चितीसाठी धरावयाचे किंवा नाही याबाबत शासनाकडून मार्गदर्शन घेत आहे." मंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाविषयी, सभागृहातील चर्चेविषयी महासंघाच्या संपूर्ण कार्यकारी मंडळाशी चर्चा करतांना उच्च शिक्षण संचालकांनी जे अवमानकारक व असभ्य उद्‌गार काढले ते शब्द छापण्याच्या लायकीचे नाहीत. त्यांच्या या उद्धटपणाला सचिवांचा पूर्ण पाठींबा असल्याशिवाय संचालक अशी हिम्मत करु शकत नाहीत हे उघडच आहे.

३०. अशी तुच्छतापूर्ण बुद्धी ठेवणाऱ्या संचालकापासून व सचिवांपासून मा. मंत्रिमहोदयांनी सावध रहाण्याची आवश्यकता आहे. शब्दात कोण काय बोलले? ते शब्द म्हणून सोडून देता येईल. पण नागपूर अधिवेशनात दिनांक १७ डिसेंबर २००८ रोजी व मुंबई अधिवेशनांत १२ जून २००९ रोजी या प्रश्नाच्या संपूर्ण अभ्यासावर आधारित जी मुदतबंद ठाम आश्वासने मा. मंत्रिमहोदयांनी सभागृहात दिलीत, त्यातील एकाही आश्वासना बाबतचे आदेश काढण्यात आले नाहीत या प्रत्यक्ष कृतिवरुन मा. मंत्रिमहोदयांनी या तुच्छतापूर्ण वागणूकीचा बोध घ्यावा, पण ती वागणूक कळण्यासाठी त्यांना आंदोलनाचा ठराव मुळातून वाचावा लागेल. मंत्रिमहोदयांनी दिलेली आश्वासने व सभागृहातील चर्चा याविषयी ही तुच्छतेची वागणूक ज्या मर्यादेपर्यंत मा. मंत्रिमहोदयांना सहन करता येईल त्या मर्यादेपर्यंत त्यांनी ती अवश्य सहन करावी पण महाराष्ट्रातील तमाम प्राध्यापकांनी सुद्धा ती सहन करावी असा आग्रह त्यांनी धरु नये. कारण ती एक अंधश्रद्धा आहे. होय! गेले १५-२० वर्षे सेवेत असलेल्या या लोकांची सेवा पहिल्या दिवसापासून धरली जाईल असे मंत्रिमहोदयांनी सांगून सुद्धा ती धरली जात नाही, पण "सचिवालयातील, संचालनालयातील, विद्यापीठ अनुदान आयोगातील एक एका टेबलवर फिरल्याबरोबर मात्र मोक्ष मिळतो." यावर श्रद्धा ठेवा, असे सांगणे ही अंधश्रद्धा आहे व अंधश्रद्धा हानिकारक असते. अनेकांना या मार्गाने मोक्ष मिळाला हे खरे असले तरी त्यांची संख्या मोजकी आहे. हजारो शिक्षक "आम्ही राजमार्गानेच जावू, अंधश्रद्धेच्या वाममार्गाने जाणार नाही" असा श्रद्धापूर्वक विश्वास ठेवून आजही ठामपणे राजमार्गावरुनच प्रवास करण्यासाठी संघर्ष करीत आहेत. याचा या संघटनेला अभिमान वाटतो. महाराष्ट्रातील पूर्वपिढीने केलेल्या संस्काराचा हा परिणाम आहे.

३१. दिनांक १५ व १६ जूलै रोजी महासंघाच्या कार्यकारी मंडळाशी झालेल्या चर्चेत "एप्रिल २००० च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिसूचनेतील खंड दोनच्या परंतुकातील तरतुदीनुसार ४ एप्रिल २००० पूर्वी लागलेल्या शिक्षकांची सेवा नेमणूकीच्या पहिल्या दिवसापासून धरली जाईल" हे चर्चेत मान्य झाले. हे वाक्य उभय बाजूंनी मान्य झाल्यावर "In this respect orders will be issued to day itself" असे वाक्य महासंघातर्फे सूचविण्यात आले तेव्हा सचिव एकदम उसळून म्हणाले "No! after two days" महासंघाने ते मान्य केले. दोन दिवसानंतर सुद्धा एका ओळीचा हा आदेश निघु शकला नाही. मा. सचिवांनी सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय शिक्षकांच्या बाजूने असला तरी त्यानंतर उच्च न्यायालयाचे काही निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या विरोधात आहेत. असे मंत्रिमहोदयांना पटवून देण्यात यश मिळविले असे आता सांगितले जात आहे.

३२. दिनांक १५ व १६ जुलै २००९ रोजी मा. मंत्रिमहोदयांच्या उपस्थितीत महासंघाच्या कार्यकारी मंडळाशी चर्चा झाली. दुसऱ्या दिवशी त्यांनी महत्वाच्या दोनही बाबींवर संपूर्णपणे सकारात्मक कल दाखविला. या दोन मागण्यांच्या बाबतीत मतैक्यपत्राचा मसुदासुद्धा तयार झाला. इतर मागण्यांवर चर्चा पुढच्या बैठकीत करु असे ठरले. चर्चेच्या शेवटी सचिव त्यांच्या कानात काहीतरी कुजबुजले. "या मतैक्यपत्रावर आम्ही कायदेशिर सल्ला घेतो त्यासाठी १७ तारखेला आपण सुटी घेऊ व १८ तारखेला सकाळी ११ वाजता पुन्हा बसु" असे सांगण्यात आले. १७ तारखेला दिवसभर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर हायकोर्टाचे काही निर्णय झाले असून त्याचे महत्व मंत्रिमहोदयांना पटवून देण्यात सचिव यशस्वी झाले असे दिसते. १८ तारखेला ११ वाजता कार्यकारी मंडळाशी चर्चा करायला मा. मंत्रिमहोदय उपस्थित नव्हते. चर्चा संपुष्टात आली. कदाचित मंत्रिमंडळात ते आवश्यक ते निर्णय करवून घेतील व त्यानंतर कार्यकारी मंडळाला बोलावतील असे आम्हाला वाटले. पण मंत्रिमंडळाची बैठक झाल्याबरोबरच उपसचिवांचे हे दिनांक २४ जुलैचे निषेधार्ह पत्र संघटनेच्या अध्यक्षांना मिळाले. कार्यकारी मंडळाने आज रविवार, दिनांक २६ जुलै २००९ रोजी झालेल्या बैठकीत हे पत्र विचारात घेतले. त्या पत्रातुन व्यक्त झालेल्या विचारांचा व निर्णयांचा तिव्र धिक्कार करण्यात येत आहे. या पत्रातून समोर आलेले कुप्रसिद्ध निर्णय हाणून पाडण्यासाठी तिव्र संघर्ष करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात येत आहे. पुढील दोन दिवसात राज्यभर ठिकठिकाणी सभा घेऊन शासनाच्या या कुप्रसिद्ध पत्राचे वाटप करण्यात यावे व त्यावरील महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाची भूमिका सुद्धा या सभांमधून विषद करावी असा निर्णय घेण्यात आला आहे.

(C.R.Sadasivan) (E.H.Kathale)
President General Secretary

**M F U C T O**

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Dr.A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. Dhote D.S., 4C, 'Rajdatta', Mahalaxmi Colony, Near Shankar Nagar, Amravati-444 606. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/ 2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/78/ 2005-08 WPP Registration No. NR/ATI/WPP-01/ 2005-08 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting : **30.07.2009**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

To,...................................................................

...................................................................

...................................................................

...................................................................

...................................................................